21-02-2025-Dai-04nn_DH_PAN_20_08_2016-3.qxp 02/20/2025 11:20 PM Page 1



# भारताची चॅम्पियन्स ट्रॉफी मोहिमेला 'शुभ' सुरुवात

## गिलच्या शतकासह बांगलादेशवर मिळवला शानदार विजय

दुबई, दि. २० : मोहम्मद शमीच्या (५ गडी) भेदक गोलंदाजीनंतर सलामीवीर शुबमन गिलने (१०१*) झळकाविलेल्या शतकाच्या जोरावर भारताने चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ मधील पहिल्याच सामन्यात बांगलादेशवर ६ विकेट्सने शानदार विजय मिळवला. बांगलादेशने प्रथम फलंदाजी करताना २२८ धावा केल्या होत्या तर भारताने लक्ष्याचा पाठलाग करताना ६ विकेट्सने आणि २१ चेंडू शिल्लक ठेवत जबरदस्त विजयाची नोंद केली. भारताने या विजयासह आता दोन गुणांची कमाई केली आहे. शुभमन गिलने यावेळी ९ चौकार आणि दोन षटकारांच्या जोरावर नाबाद १०२ धावांती खेळी साकारली.

बांगलादेशकडून मिळालेल्या २२९ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करण्यासाठी रोहित शर्मा आणि शुबमन गिलची जोडी मैदानात उतरली. दोघांनीही सुरुवातीपासून फटकेबाजीस सुरुवात केली. दोघांनाही पहिल्या गड्यासाठी ६९ धावांची भागिदारी रचली. मात्र, मोठा फटका मारण्याच्या नादात रोहित बाद झाला. रोहितने झटपट खेळी करत ७ चौकारांसह ४१ धावा करत बाद झाला. त्याचे अर्धशतक ९ धावांनी हुकले. रोहित माघारी परतल्यानंतर फलंदाजीस आलेल्या विराट कोहलीने गिलला काही वेळ साथ दिली. दोघांनीही धावसंख्या शंभरीपार नेली. अखेर रिशदने ही जोडी फोडली. कोहलीने २२ धावा केल्या. त्यानंतर फलंदाजीस आलेल्या श्रेयस अय्यर १५ धावा, अक्षर पटेल ८ धावा करत पटापट बाद झाले. विराट, श्रेयस आणि अक्षरचे लागोपाठ विकेट गेल्यानंतर भारतीय संघ आता पेचात अडकतो की काय, अशी स्थिती निर्माण झाली. पण नंतर आलेल्या केएल राहुलने गिलबरोबर संघाचा डाव सावरत विजयाकडे नेले.

केएल राहुलचा एक सोपा झेल सोडल्यानंतर राहुलने गियर बदलत गिलबरोबर वेगवान खेळी केली. राहुलने ४७ चेंडूत २ षटकार आणि एका चौकारासह ४१ धावा केल्या. तर शुबमन गिल १२९ चेंडूत नऊ चौकार आणि दोन षटकारांच्या मदतीने नाबाद १०१ शतकी खेळी करत नाबाद माघारी परतला. बांगलादेशकडून रिशाद हुसैनने २ तर मुस्तफिजूर आणि तस्किन यांनी प्रत्येकी १-१ विकेट घेतली.

तत्पूर्वी, नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचा निर्णय घेणाऱ्या बांगलादेशला चांगलाच अंगलट आला. डावातील पहिल्या षटकातील पहिल्या चेंडूवर शमीने सौम्या सरकारला यष्टिरक्षक के.एल. राहुलकरवी झेलबाद केले आणि इथून बांगला देशच्या पडझडीला सुरुवात झाली. मिडऑफवरून महत्त्वाकांक्षी फटका मारण्याच्या प्रयत्नात सौम्याने आपली विकेट गमावली. नजमूल शांटोला हर्षित राणाने शॉर्ट कव्हरवरील विराटकरवी झेलबाद केले. शमीच्या अप्रतिम आऊटस्विंगरवर शुभमन गिलने हवेत झेपावत उत्कृष्ट झेल टिपला आणि धोकादायक मेहदी हसन मिराजची खेळीही स्वस्तातच संपुष्टात आली.

तान्झीद हसन चौथ्या गड्याच्या रूपाने यष्टीमागे झेलबाद झाला, त्यावेळी के.एल. राहुलने केलेले जोरदार अपील निर्णायक ठरले. अक्षरला यावेळी चेंडूने बॅटची कड घेतली असेल का, याची खात्री नव्हती. मात्र, के.एल. राहुलने जोरदार अपील केल्यानंतर पंचांनीही तो बाद असल्याचा निर्वाळा दिला. पुढील चेंडूवरच मुशफिकूर रहिमनेही के.एल. राहुलकडेच झेल देत तंबूचा रस्ता धरला आणि यासह बांगला देशची ८.३ षटकांत ५ बाद ३५ अशी दाणादाण उडाली. बांगलादेशचा निम्मा संघ स्वस्तात गारद झाल्याने सामना कमी धावसंख्येचा होऊ शकेल, असे चित्र होते. मात्र, तौहिद व जाकेर यांनी १५४ धावांची भागीदारी साकारत संघाचा डाव सावरण्याचा प्रयत्न केला. पुढे जाकेरला बाद करत ही जोडी फोडली. शमीचा हा २०० वा वन डे बळी होता. जाकेरने ११४ चेंडूंत चार चौकारांच्या मदतीने ६८ धावा केल्या. भारतीय संघातर्फे शमीने लौकिकाला साजेसा मारा करत १० षटकांत ५३ धावांत ५ बळी घेतले. याशिवाय हर्षित राणाने ३ तर अक्षर पटेलने २ बळी घेतले.






### विराट कोहलीची नवा विक्रम

या सामन्यात स्टार खेळाडू विराट कोहलीनेही एक नवा विक्रम केला आहे. भारतासाठी एकदिवसीय सामन्यांमध्ये क्षेत्ररक्षक म्हणून सर्वाधिक झेल घेण्याच्या बाबतीत विराटने माजी भारतीय कर्णधार मोहम्मद अझरुद्दीनच्या विक्रमाशी बरोबरी केली आहे. कोहलीने आता एकदिवसीय सामन्यात १५६ झेल घेतले आहेत. त्याने टीम इंडियाचे माजी दिग्गज कर्णधार मोहम्मद अझरुद्दीन यांची बरोबरी केली आहे. या यादीत सचिन तेंडुलकरचेही नाव आहे, त्याने एकदिवसीय सामन्यात १४० झेल घेतले आहेत. यानंतर, राहुल द्रविड आणि सुरेश रैनाने अनुक्रमे १२४ आणि १०२ झेल घेतले आहेत.

----------------------------------

### शमीने मोडला झहीरचा विक्रम

बांगलादेशविरुद्धच्या पहिल्या सामन्यात मोहम्मद शमीने शानदार गोलंदाजी करत ५ विकेट्स घेत वनडेत २०० विकेट्स पूर्ण करत झहीर खानचा मोठा विक्रम मोडला आहे. या सामन्यात मोहम्मद शमीने बांगलादेशविरुद्ध तिसरी विकेट घेत इतिहास घडवला आहे. तो मर्यादित षटकांच्या आयसीसी स्पर्धांमध्ये भारताकडून सर्वाधिक विकेट्स घेणारा गोलंदाज बनला आहे. या बाबतीत त्याने झहीर खानला मागे टाकले आहे. शमी मर्यादित षटकांच्या सामन्यात भारताकडून सर्वाधिक विकेट्स घेणारा गोलंदाज बनला आहे. या बाबतीत त्याने झहीर खानला मागे टाकले, ज्याने ४४ सामन्यांमध्ये ७१ विकेट्स घेतल्या होत्या. पण आता शमीने ३३ सामन्यांमध्ये ७२ विकेट्स घेत एक मोठी कामगिरी आपल्या नावावर केली आहे. याशिवाय, मोहम्मद शमी एकदिवसीय सामन्यात सर्वात जलद २०० विकेट्स घेणारा जगातील दुसरा गोलंदाज बनला आहे. मात्र, त्याने २०० विकेट्स पूर्ण करण्यासाठी ५१२६ चेंडू टाकले. या बाबतीत त्याने धोकादायक ऑस्ट्रेलियन गोलंदाज मिचेल स्टार्कला मागे टाकले. मिचेल स्टार्कने ५२४० चेंडूत ही कामगिरी केली होती.

---

## निवडक

### गिरी येथील भूमिका सातेरी देवीचा आज वर्धापनदिन

टीम दैनिक हेराल्ड

म्हापसा, दि. २० : गिरी म्हापसा येथील श्री देवी भूमिका सातेरी देवीचा उद्या शुक्रवार दि. २१ रोजी वर्धापनदिन साजरा होणार आहे. यानिमित्त संध्याकाळी ६ वाजता भूमिका सातेरी भजनी मंडळाचा कार्यक्रम, त्यानंतर दीपोत्सव होईल. शनिवार दि. २२ रोजी जत्रोत्सव त्यानिमित्त श्री भूमिका सातेरी देवीचा उत्सव मूर्तीची गिरी गावातून पालखीतून भव्य मिरवणूक व रात्री दशावतारी नाटक 'नरशिर यज्ञ' सादर होणार आहे.

--------------------

### फोंडा विश्व हिंदू परिषद सभागृहात चतुरंग प्रतिष्ठानतर्फे 'सुतारफेणी'

टीम दैनिक हेराल्ड

सावईवेरे, दि. २० : चतुरंग प्रतिष्ठानतर्फे फोंडा येथील विश्व हिंदू परिषद सभागृहात उद्या शुक्रवार, दि. २१ फेब्रुवारी रोजी संध्याकाळी ६.३० वा. व्हायफळ प्रस्तुत 'सुतारफेणी' हा खास कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. 'सुयोग रिसबूड' या तरुण कलाकाराच्या व्हायफळ स्पेशल सुतारफेणी या आगळ्या वेगळ्या संगीतमय कथाकथनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. सर्वांनी उपस्थित रहावे, असे आवाहन आयोजकातर्फे करण्यात आले आहे.

--------------------

### 'गावन काणी' वर उद्या संजय गावकर यांचे व्याख्यान

टीम दैनिक हेराल्ड

आगोंद, दि. २० : गोवा विद्यापीठाच्या समाजशास्त्र विभागातर्फे काणकोण येथे सुरू असलेल्या ग्रामीण शिबिराचे औचित्य साधून गोव्याचा दुर्मिळ लोककला प्रकार 'गावन काणी' यावर व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. त्यात प्रमुख वक्ते म्हणून आदिवासी साहित्याचे अभ्यासक तथा शिक्षक संजय गावकर मार्गदर्शन करणार आहेत. हा कार्यक्रम दि.२२ फेब्रुवारी रोजी चार रस्ता, नगर्से येथील आसरा घरात सायंकाळी ६ वाजता होईल. व्याख्यानाला जोडूनच ज्येष्ठ लोककलाकार बाबू लकमू वेळीप आणि त्यांचे साथीदार 'गावन काणी' हा लोककला प्रकार सादर करतील. या कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे आवाहन साहाय्यक प्रा. केवल नाईक यांनी केले आहे.

--------------------

### 'सावड' ला लोकशाहीर अण्णा भाऊ साठे स्मृती कादंबरी पुरस्कार

टीम दैनिक हेराल्ड

साखळी, दि. २० : महाराष्ट्र साहित्य परिषद राजगुरूनगर खेड पुणे येथील लोकशाहीर अण्णा भाऊ साठे स्मृती कादंबरी पुरस्कार चंद्रकांत महादेव गावस यांच्या 'सावड' या पुस्तकास प्राप्त झाला आहे. रोख रक्कम, सन्मानचिन्ह, शाल, श्रीफळ असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. चंद्रकांत महादेव गावस यांच्या पाली, पिळगी, परीस, कलंकिनी, इदवास या कादंबऱ्या, सावड, वळवाचा पाऊस, पानगळ हे ललित साहित्य, हुंकार,जात्यावरील ओव्या हे लोकसाहित्य,मळ–परिमळ हे व्यक्ती चित्र पुस्तक प्रकाशित झाले आहे.

पुरस्कार–पाली कादंबरीस गोमंतक मराठी अकादमी पुरस्कार, कला अकादमी पुरस्कार, इदवास कादंबरीस ना.सी.फडके पुरस्कार पुणे, गोमंतक मराठी अकादमी पुरस्कार गोवा,कला अकादमी पुरस्कार गोवा, दि गोवा हिंदु असोसिएशन मुंबईचा बा. भ. बोरकर पुरस्कार,सावड पुस्तकास सांगाती अकादमी पुरस्कार बेळगाव, जिवन गौरव पुरस्कार, कामेरी सांगलीचे पुरस्कार प्राप्त झाले असून इयत्ता ७ वीच्या पुस्तकात 'मन करा रे प्रसन्न' व 'कायापालट' हे दोन धडे आणि आठवीच्या पुस्तकात 'संत तिरुवल्लुवर' हा धडा समाविष्ट करण्यात आला आहे.गोवा विद्यापीठात पाली व जात्यावरील ओव्या या दोन पुस्तकांचा समावेश आहे.इदवास ही कादंबरी द्वितिय वर्ष बी.ए.साठी समाविष्ट आहे.भक्तोध्दार मासिकाचे संस्थापक संपादक आहेत.गोमंतक मराठी साहित्य परिषदेचे संस्थापक अध्यक्ष आहेत.अनेक वर्तमानपत्रातून सदर लेखन ते करतात.गोमंतक मराठी अकादमी व बिल्वदल आयोजित साहित्य संमेलनाचे अध्यक्षपदाचा मान त्यांना प्राप्त झाला आहे.

--------------------



साखळी : प्रयागराज महाकुंभात देखणी नृत्य सादर केलेला श्री सद्गुरू पारवडेश्वर महिला पथक गट सोबत मार्गदर्शक.

### महाकुंभात पारवडेश्वर महिला पथकातर्फे कला सादर

टीम दैनिक हेराल्ड

साखळी, दि. २० : केरी सत्तरी येथील श्री सद्गुरू पारवडेश्वर महिला पथकातर्फे उत्तरप्रदेश प्रयागराज महाकुंभ मेळाव्यात गोव्याचे प्रतिनिधित्व करताना गोव्याचे पारंपरिक देखणी नृत्य सादर केले. याबद्दल पथकाचे अभिनंदन करण्यात येत आहे. गोव्याच्या कला आणि सांस्कृतिक संचालनालयातर्फे या महिला पथकाची निवड करण्यात आली होती. पथक प्रमुख म्हणून सौ.उत्कर्षा उत्तम गावस यांनी या पथकाचे नेतृत्व केले. या महिला पथकाला प्रथमच कला आणि सांस्कृतिक संचालनालयातर्फे कुंभमेळ्यात गोव्याची संस्कृती व परंपरा सादरीकरण करण्याचा बहुमान मिळाला आहे. हे पथक दिडी, फुगडी, धालो, कळशी नृत्य तसेच इतर पारंपरिक कार्यक्रम करण्यात अव्वल स्थानावर आहे. या पथकात उत्कर्षा गावस, सिंधिया पार्सेकर, ललिता पार्सेकर, प्रतिमा गावस, वनिता गावस, ग्रिष्मा गावस,कृतिका गावस,संपदा गावस,अस्मिता गावस,गायत्री हळीत,रुपाली शेलार,तसेच संतोष पार्सेकर,अर्जुन गावस, प्रभाकर गावस व सूर्यकांत मॅजिक यांचा समावेश होता.

------------

### पेडणे वेद ॲक्टिव्हिटी सेंटरच्या विद्यार्थ्यांचे घवघवीत यश

टीम दैनिक हेराल्ड

हरमल, दि. २० : मुंबई ठाणे येथे पार पडलेल्या एडुस्मार्ट इन्कच्या न्याशनल अबॅकस, हॅन्डरायटिंग व ड्रॉइंग स्पर्धेत दुसऱ्या फेरीत सौं. योजना पारिपत्ये यांच्या पेडणेतील वेद ॲक्टिव्हिटी सेंटर मधील मुलांनी घवघवीत यश मिळविले.

या स्पर्धेत सिद्धिथ परब याने अबॅकस डी ३ गटात द्रितीय क्रमांक, वेद पारिपत्ये, हार्दिक तारी व कु युख्था परब यांना अबॅकस इ ४ गटातून उत्तेजनार्थ बक्षीस मिळविले. त्याचबरोबर नॅशनल हस्ताक्षर स्पर्धेत कु नव्या केरकर हिस उपविजेतेपद, युक्त्या परब उपविजेता, ध्रुवी पालयेकर व सिद्धिथ परब यांना उत्तेजनार्थ बक्षीस मिळाले. राष्ट्रीय चित्रकला स्पर्धेत ध्रुवी पालयेकर हिला द्रितीय क्रमांक व आशी तीळवे हिने उपविजेतेपद मिळाले. रिद्धी शेट्ये, शिवांश तारी, रितिका नाईक, नव्या केरकर व सिद्धिथ परब हे अबॅकस स्पर्धेत रिजनल अचिव्हर ठरले. त्यांच्या यशाबद्दल सर्व विजेत्या मुलांचे तसेच वेद ॲक्टिव्हिटी सेंटरचे नागरिक व विद्यालयाचे शिक्षक तसेच पालकांनी अभिनंदन केले आहे.

---

# बदललेला पिनकोड आठ दिवसांत पूर्ववत करा

मंत्री श्रीपाद नाईक यांचा निवेदनानंतर पणजी टपाल कार्यालयाचे सुप्रिटेंडंटना आदेश

टीम दैनिक हेराल्ड



पणजी : केंद्रीयमंत्री श्रीपाद भाऊ नाईक यांना निवेदन सादर करताना पार्से, आगरवाडा चोपेडे व मोरजी गावचे शिष्टमंडळ.

पेडणे, दि. २० : पार्से , आगरवाडा– चोपडे व मोरजीचा पोस्टाने बदलेला पिनकोड नंबर पूर्ववत करण्यासाठी पोस्ट मास्टर जनरलला निवेदन देऊन महिना उलटला तरी अद्याप निर्णय न घेतल्याने या गावच्या पंचायत मंडळ आणि नागरिकांनी केंद्रीय मंत्री तथा उत्तर गोवा खासदार श्रीपाद नाईक यांची भेट घेऊन बदलेला पिनकोड पूर्ववत करण्याची मागणी केली आहे. दरम्यान केंद्रीय मंत्री श्रीपाद नाईक यांनी पणजी टपाल कार्यालयाचे सुप्रिटेंडंट श्री राव यांच्याशी संपर्क साधून ८ दिवसात बदलेला पिनकोड क्रमांक पूर्ववत करण्याचा आदेश दिल्याने शिष्टमंडळाने समाधान व्यक्त केले आहे.

या शिष्ट मंडळात पार्सेचे सरपंच अजय कलंगुटकर ,उप सरपंच रेश्मा कांबळी, सौ पार्सेकर, पार्से नागरिक समितीचे अध्यक्ष देवेंद्र प्रभुदेसाई, आगरवाडा चोपडे पंचायतीचे सरपंच हेमंत चोपडेकर, उपसरपंच शिल्पा राऊत, माजी सरपंच सचिन राऊत, आगरवाडा चोपडे नागरिक समितीचे अध्यक्ष विवेक गावकर, सीताराम परब , मोरजी चे सरपंच पवन मोरजे,माजी सरपंच उमेश गडेकर इत्यादींचा समावेश होता

यावेळी शिष्टमंडळाने केंद्रीय मंत्री श्रीपाद नाईक यांना पिनकोड बदलामुळे उद्भवणाऱ्या समस्यांची जाणीव करून दिली.यापूर्वी पेडणे पोस्ट कार्यालयाशी संबंधित असलेल्या १६ हजार नागरिकांचा पिनकोड बदल केल्यामुळे सर्वच सरकारीकागदपत्रे , मतदान ओळख पत्र,आधार कार्ड, पॅन कार्ड आदी बदल करावा लागणार असल्याने १६ हजार नागरिकांना संबंधित खात्यात हेलपाटे मारावे लागणार आहे तसेचा आर्थिक भुर्दंड सहन करावा लागणार आहे. असे सांगून पिन कोड बदल पूर्ववत करून नागरिकांना दिलासा द्यावा अशी मागणी केली. श्रीपाद नाईक यांनी शिष्ट मंडळाचे म्हणणे ऐकून घेऊन या गोष्टीस कारणीभूत असलेले पोलिस सुप्रिटेंडंट श्रीराव यांच्याशी संपर्क साधून आठ दिवसात बदलेला पिनकोड नंबर पूर्ववत करण्यास सांगितले.



पार्से : विजेत्या सोबत प्रमुख पाहुणे अरुण नाईक, विठोबा बगळी, रामनाथ सावंत, बाळकृष्ण बर्डे, हदयनाथ तांबोस्कर व साहिल वेलिंगकर.

# चित्रकला स्पर्धेत कमळेश्वर हायस्कूलचे सूयश

टीम दैनिक हेराल्ड

पेडणे, दि. २० : कोरगाव शालेय परिवारातर्फे पार्से येथील श्री दुर्गा हायस्कूलमध्ये शिवजयंती निमित्त शिवाजी महाराज या विषयावर आयोजित केलेल्या चित्रकला स्पर्धेत दोन्ही गटात कोरगाव देऊळवाडा येथील श्री कमळेश्वर हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी प्रथम क्रमांक पटकावला.

सविस्तर निकाल : अ गट प्रथम :सान्वी प्रशांत शिरोडकर ( श्री कमळेश्वर हायस्कूल देऊळ वाडा) द्वितीय : कृतिका पांडुरंग गावडे ( श्री दुर्गा हायस्कूल, पार्से) तृतीय : दिया हनुमंत जोशी ( प्रज्ञा हायस्कूल देवसू), ब गट : प्रथम : मयुरी विनोद नाईक ( श्री कमळेश्वर हायस्कूल देऊळ वाडा), द्वितीय : मनीष महादेव गवंडी ( प्रज्ञा हायस्कूल देवसू), तृतीय : तुलसी लाडू गडेकर ( दुर्गा हायस्कूल पार्से).

परीक्षक म्हणून हृदयनाथ तांबोस्कर व साहिल वेलिंगकर यांनी काम पाहिले.

बक्षीस वितरण समारंभाला प्रमुख पाहुणे म्हणून मांद्रे येथील श्री सप्तेश्वर उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य अरुण नाईक, खास निमंत्रित म्हणून कोरगाव येथील श्री कमळेश्वर उच्च माध्यमिक विद्यालयाचे अध्यापक विठोबा बगळी उपस्थित होते. याशिवाय व्यासपिठावर श्री दुर्गा हायस्कूलचे चेअरमन रामनाथ सावंत, व्यवस्थापक बाळकृष्ण बर्डे, मुख्याध्यापिका किरणप्रभा आरोलकर, परीक्षक हृदयनाथ तांबोस्कर, साहिल वेलिंगकर आदी उपस्थित होते.

मान्यवरांच्या हस्ते विजेत्यांना बक्षिसे प्रदान करण्यात आली. हर्षा सावंत यांनी सूत्रसंचलन केले. रामनाथ सावंत यांनी मान्यवरण स्मृतिचिन्ह प्रदान केली. बाळकृष्ण बर्डे यांनी आभार मानले.

---

# सौरऊर्जेच्या वापरामुळे कार्बन फूटप्रिंटला आळा

## ज्योकीम फर्नांडिस यांचे प्रतिपादन ; साखळी महाविद्यालयात सौरऊर्जेवर कार्यशाळा उत्साहात

टीम दैनिक हेराल्ड

साखळी, दि. २० : सौरऊर्जा ही अक्षय ऊर्जा आहे. त्यामुळे तिच्या योग्य वापरातून कार्बन फूटप्रिंटला कमी करता येते किंवा तिला आळा घालता येतो, असे प्रतिपादन अक्षय ऊर्जा क्षेत्राशी संबंधित तज्ज्ञ ज्योकीम फर्नांडिस यांनी केले.

कला, विज्ञान आणि वाणिज्य शासकीय महाविद्यालय साखळी येथील भौतिकशास्त्र विभागाने डीबीटी स्टार कॉलेज योजनेंतर्गत सौरऊर्जा : शाश्वत भविष्याची निर्मिती या विषयावर आयोजित केलेल्या एकदिवसीय कार्यशाळेत ते प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते.

यावेळी आयक्यूएडीचे संचालक डॉ. वैभव चिंदरकर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नामदेव गावस,भौतिकशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा.महेंद्र पेडणेकर, कार्यशाळेचे समन्वयक प्रा. दौत आगा, प्रा.सुवर्णा पाटील, प्रा.अनुष्का पणजीकर आदी मान्यवर उपस्थित होते. या कार्यशाळेत बीएसस्सी भाग ३, भौतिकशास्त्र विभागातील १४ विद्यार्थ्यांना सहभाग घेतला. विद्यार्थ्यांमध्ये सौरऊर्जा, त्याची निर्मिती, साठवणूक आणि व्यवहारातील उपयोजन याबाबतची व्यापक समज निर्माण करणे हा या कार्यशाळेचा हेतू होता.




साखळी : 'सौरऊर्जा : शाश्वत भविष्याची निर्मिती' या विषयावरील कार्यशाळेत बोलताना आयक्यूएडीचे संचालक डॉ. वैभव चिंदरकर. सोबत मुख्य मार्गदर्शक ज्योकीम फर्नांडिस, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नामदेव गावस, प्रा.महेंद्र पेडणेकर व इतर मान्यवर.

### कार्यशाळेतील ठळक बाबी

कार्यशाळेच्या सुरुवातीला सौर ऊर्जेच्या मूलभूत बाबी, वैश्विक ऊर्जा क्षेत्रातील त्याचे महत्त्व आणि या ऊर्जेचे विजेत रूपांतर करण्यामागील शास्त्रीय दृष्टिकोन आदी घटकांवर अभ्यासपूर्ण चर्चा करण्यात आली. यानंतर मुख्य मार्गदर्शक ज्योकीम फर्नांडिस यांनी सौरऊर्जेवर चालणाऱ्या सौर पॅनेल, सौर गिझर आणि सौर ऊर्जेवर चालणाऱ्या वाहनांसंदर्भात विद्यार्थ्यांना माहिती दिली. सौरपॅनेल, सौर गिझर आणि सौर ऊर्जेवर चालणारी बाईक यांना हाताळण्याचा प्रत्यक्ष अनुभव विद्यार्थ्यांनी या कार्यशाळेत घेतला. कार्यशाळेच्या समारोपसत्रात विद्यार्थ्यांनी तज्ज्ञ ज्योकीम फर्नांडिस यांच्यासोबत विविध प्रश्नांसंदर्भात चर्चा केली.

### विद्यार्थ्यांना मिळाला समृद्ध अनुभव

सौरऊर्जा : शाश्वत भविष्याची निर्मिती या विषयावरील ही कार्यशाळा विद्यार्थ्यांना माहितीपूर्ण आणि समृद्ध अनुभव देणारी ठरली. ज्यामुळे विद्यार्थ्यांना सौरऊर्जा तंत्रज्ञानाचे सैद्धांतिक ज्ञान आणि व्यावहारिक अनुभव मिळाले.

RNI No. GOAMAR/2013/49899 **दैनिक हेराल्ड** वर्ष १३, अंक १६९ **मालक:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., **प्रिंटर:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशक:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशन स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा, **छपाई स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा. **एडिटर इन चीफ:** श्री. आर. एफ. फर्नांडिस, **संपादक:** श्री. दिनेश वासुदेव केळुस्कर (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी).

RNI No. GOAMAR/2013/49899 **Dainik Herald** Volume 13, Issue 169 **Owner:** Herald Publications Pvt. Ltd., **Printer:** Mr. Walter Ligorio D'Sousa, **Publisher:** Mr. Walter Ligorio D'Sousa,, **Published from:** Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa and **Printed from**: Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa. **Editor in Chief** Mr. R. F. Fernandes, **Editor :** Mr. Dinesh Vasudev Keluskar (Responsible under P.R.B. Act), .